# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
(शिक्षण विभाग)

क्र.1583/शि.वि. दि. 06/02/2014.

प्रति,

मुख्याध्यापक /मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्यमिक शाळा
महानगरपालिका, नागपूर.

**विषय :– भारत निवडणूक आयोगाच्या स्विप –2 कार्यक्रमा अंतर्गत पालकांचे संकल्प पत्रे भरून घेण्याबाबत.**

**संदर्भ** :– 1) क्र. निवडणूक–1/कार्या–3/संकल्पत्र/कावि136/2014 जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, यांचे कार्यालय, नागपूर दि. 03.02.2014.
2) शासनाचे पत्र क्र. ईएलआर–2014/प्र.क्र.95(ए)/14/33 दि. 31.01.2013.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भांकित पत्रान्वये भारत निवडणूक आयोगाच्या स्विप–2 कार्यक्रमा अंतर्गत मतदारांना त्यांच्या मतदान हककाची तसेच जबाबदारीची जाणीव व्हावी या हेतूने शालेय विद्यार्थ्यांमार्फत त्यांच्या पालकांकडून व परिचीत व्यक्तीकडून संकल्पपत्र भरून घ्यावयाचे निर्देश दिले आहे. संकल्प पत्राची प्रत यासोबत जोडण्यात आली आहे. जे मतदार स्वेच्छेने संकल्प पत्र भरून देतील अश्या मतदारांची संकल्प पत्रे त्वरीत जिल्हाधिकारी कार्यालयाला सादर करावयाचे आहे तरी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी भरून आणलेले संकल्प पत्र एकत्रित करून दि. 17.02.2014 पर्यंत शिक्षण विभाग,म.न.पा. कार्यालयात श्री. प्रशांत टेंभूर्णे स.अ. यांचेकडे सादर करावे.

शिक्षणाधिकारी,
**नागपूर महानगरपालिका,** नागपूर

PC:2/D:\Tembhurne sir \ Letter 1.doc

# संकल्प पत्र

मी ------------------------------------------------ शपथ घेतो की, मी भारतीय घटनेने मला मतदान करण्याचा जो अमूल्य अधिकार दिला आहे त्या अधिकाराचा कोणत्याही परिस्थितीत वापर करीन.

मतदान करून आपला उमेदवार निवडण्याचा माझा फक्त अधिकार नसून ती माझी राष्ट्रीय जबाबदारी आहे.मी अशीही शपथ घेतो की , देशहिताकरिता जनतेच्या इच्छाआकांक्षा पूर्ण करू शकणा-या सर्वोत्तम उमेदवाराची निवड करण्यासाठी मी माझ्या कुटुंबातील सदस्यांना तसेच माझ्या परिचित व्यक्तिंना मतदान करण्यासाठी प्रेरित व प्रोत्साहित करीन.

मी अशीही शपथ घेतो की, मी कोणत्याही भितीपोटी,लालसेपोटी मतदान करणार नाही तसेच धर्मनिरपेक्ष भावनेने मतदान करण्याची जबाबदारी मी पार पाडीन.

दिनांक-

( सही )

मतदाराचे नाव

पत्ता-

मतदान केंद्र क्रमांक व नाव ------------------

विधानसभा क्रमांक व नाव------------------

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,

क्रमांक:- ईएलआर-२०१४/प्र.क.९५(१)/१४/३३
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- ३१ जानेवारी, २०१३.

प्रति,

जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)

विषय:- संकल्पपत्राबाबत.........

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत नमूद करण्यात येते की भारत निवडणूक आयोगाने दि.२३/१/२०१४ च्या परिपत्रकानुसार स्वीप-२ कार्यक्रमांतर्गत मतदारांना त्यांच्या मतदान हक्काची तसेच जबाबदारीची जाणीव व्हावी या हेतुने शालेय विद्यार्थ्यांमार्फत त्यांच्या पालकांकडून व परिचित व्यक्तिंकडून संकल्पपत्र भरून घेण्यात यावेत असे सूचित केले आहे. त्या अनुषंगाने आपणास सूचित करण्यात येते की आपण आपल्या जिल्ह्यातील शाळांच्या मुख्याध्यापकांमार्फत शालेय विद्यार्थ्यांच्या पालकांकडून तसेच परिचित व्यक्तिंकडून संकल्पपत्र भरून घेण्याबाबत आवाहन करावे. ( संकल्पपत्राचे प्रारूप सोबत जोडले आहे ). जे मतदार स्वेच्छेने संकल्पपत्रे भरून देतील अशा मतदारांची संकल्पपत्रे आपल्या कार्यालयाकडे जमा ठेवण्यात यावीत व आपल्याकडे जमा झालेल्या संकल्पपत्रांची संख्या या कार्यालयास दि.३० मार्च, २०१४ पर्यंत सादर करावी.

उपरोक्त परिपत्रकानुसार या संदर्भातील आवाहनवजा कार्यवाही व्यापक प्रसिद्धी देऊन वेळोवेळी करावी.

सोबत-

१) संकल्पपत्र
२) दि.२३/१/२०१४ ECI चे पत्र

आपला,

३१/०१/१४

(शिरीष मोहोड)
अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र शासन

प्रत-

उप जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)

ISSUED
ON.31.1.2014
BY.......

Prasad letter 3